(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

मुंबई येथील उच्च न्यायालयात
फौजदारी अपीलीय अधिकारीतेत
अटकपूर्व जामीन अर्ज क्रमांक १०४८/२०२५

पवन अमर मुत्रेजा ....अर्जदार

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य आणि अन्य. . ....उत्तरवादी

सुश्री. कल्याणी राठोड यांच्या सूचनेवरून श्री.राहुल मोघे अर्जदारासाठी.

सुश्री.सुप्रिया काक, राज्यासाठी एपीपी .

श्री. चिराग सावंत उत्तरवादी क्रमांक २ साठी.

श्री. ओमासे,पीएसआय,विलेपार्ले पोलिस ठाणे हे उपस्थित होते.

न्यायमंच : न्या.अद्वैत एम. सेठना.
राखून ठेवल्याचा दिनांक : १४ मे २०२५
घोषित केल्याचा दिनांक : १६ मे २०२५

<u>आदेश</u> :-

१. १४ एप्रिल २०२५ रोजी विलेपार्ले पोलीस स्टेशन, मुंबई येथे दाखल करण्यात आलेला सी.आर.क्रमांक १४२/२०२५ शी संबंधित भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३

(“बीएनएस”) च्या कलम ४८२ अन्वये अटकपूर्व जामिनासाठी हा अर्ज आहे. १४ एप्रिल २०२५ रोजी २१.४० वाजता फिर्यादीच्या-उत्तरवादी क्रमांक २ च्या तक्रारीच्या आधारे एफआयआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे बीएनएसच्या कलम ३१८ (४), ३१६ (२) आणि ६१ (१) अंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला.

२. अर्जदार/आरोपी क्रमांक १ म्हणजेच पवन मुत्रेजा हे गेल्या २० वर्षांपासून रिअल इस्टेट एजंट आहेत. सहआरोपी क्रमांक २ परेश शहा आणि सहआरोपी क्रमांक ३ प्रकाश व्यास आहेत. फिर्यादी श्री. जयप्रकाश सुरू शेट्टी हे विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथे गीता या नावाचे रेस्टॉरंट चालवतात.

३. थोडक्यात फिर्यादी पक्षाचे प्रकरण असे की, या अर्जदाराने सहआरोपी क्रमांक २ व ३ सोबत कट रचून फसवणूक केली आणि त्याला चुकीच्या पद्धतीने गीता रेस्टॉरंटची मालकी फिर्यादीच्या नावाने हस्तांतरित करण्यासाठी महापालिकेच्या काही अधिकाऱ्यांना बेकायदेशीरपणे परितोषण देण्याच्या हेतूने ८२ लाख रुपये म्हणजे ५० लाख रुपये बँक ट्रान्स्फरद्वारे आणि ३२ लाख रुपये रोखीने देण्यास भाग पाडले.

४. शिवाय, फिर्यादी पक्षाचे असे प्रकरण आहे की फेब्रुवारी २०२४ ते एप्रिल २०२४ या महिन्यांत वेगवेगळ्या तारखांना वेगवेगळ्या रकमा हस्तांतरण करून असे एकूण ९.५

लाख रुपये आरोपी क्रमांक ३ ने अर्जदाराच्या बँक खात्यात त्याच दिवशी म्हणजेच आरोपी क्रमांक ३ ला फिर्यादीकडून अशी रक्कम मिळाली त्याच दिवशी हस्तांतरित केल्या आहेत. ही रक्कम रु.९.५ लाख जी एकूण ५० लाख रुपयांच्या बँक हस्तांतरण रकमेपैकी आहे.

५. तसेच फिर्यादीने या अर्जदाराला वेगवेगळ्या तारखांना रोख स्वरूपात एकूण रु.९,२४,५००/- रुपये दिले आणि त्यानंतर लगेचच या अर्जदाराने स्वत:च्या बँक खात्यात ही रक्कम जमा केली आहे, हे अभिलेखावरील बँक स्टेटमेंटमधील नोंदींमधून दिसून येते. अशी रक्कम रु.९,२४,५००/- ही रक्कम फिर्यादीकडून अर्जदाराला प्राप्त झालेल्या एकूण ३२ लाख रुपयांच्या रोख रकमेपैकी आहे.

६. एफआयआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे आणि तपासादरम्यान गोळा केलेल्या सामग्रीच्या आधारे, हे स्पष्ट होईल की आरोपी आणि सहआरोपी क्रमांक २ आणि ३ हे एकमेकांना ओळखत होते आणि ते वारंवार फिर्यादीच्या रेस्टॉरंटमध्ये जात होते. हा अर्जदारच होता ज्याने सुरुवातीला फिर्यादीकडे संपर्क साधून रेस्टॉरंट फिर्यादीच्या नावावर हस्तांतरित करण्यात आणि बीएमसी अधिकाऱ्यांशी समन्वय साधून भाडे कमी करण्यात मदत देऊ

केली, ज्यात आरोपी क्रमांक २ आणि ३ यांची मदत आणि सहभाग होता. अशा बहाण्याने ८२ लाख रुपयांची रक्कम फिर्यादीकडून घेण्यात आली.

७. अर्जदाराने त्यांचे विद्वान वकील श्री.राहुल मोघे यांच्यामार्फत फिर्यादी पक्षाच्या खटल्याला जोरदारपणे प्रत्युत्तर दिले आहे. ते सुरुवातीलाच असे म्हणतात की,अर्जदाराला फसवण्यात आले आहे. एफआयआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराची कोणतीही भूमिका नाही आणि फिर्यादीकडून कोणत्याही रकमेचा लाभार्थी नाही. ते असे सादर करतात की अर्जदाराला २६ फेब्रुवारी २०२४ ते २४ एप्रिल २०२४ या कालावधीत आरोपी क्रमांक ३ कडून एकूण रु.११,४५,०३४/- इतकी रक्कम कर्ज म्हणून प्राप्त झाली. त्यापैकी रक्कम रुपये ५,९४,०११/- अर्जदाराने आरोपी क्रमांक ३ ला परत केले आणि उर्वरित रक्कम त्याच्या आईच्या कर्करोगाच्या उपचारासाठी वापरली. त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ त्यांनी वैद्यकीय बिलांचा आधार घेतला. या रकमेचा फिर्यादीकडून आरोपी क्रमांक २ व ३ ला मिळालेल्या रकमेशी कोणताही संबंध नाही.

८. अर्जदाराचे प्रकरण असे आहे की अर्जदार स्थावर संपदा दलाल आहे आणि एप्रिल २०२४ मध्येच फिर्यादीच्या संपर्कात आला कारण त्याचे नाव परेश शहा यांनी फिर्यादीला सुचवले होते ज्याला बीएमसीशी वाद मिटल्यानंतर त्याचे गीता रेस्टॉरंट विकायचे होते.

फिर्यादीने प्रकाश व्यास यांच्याशी आपला वाद मिटवण्यासाठी आणि त्यांना निर्वेध मालकी हक्क मिळवून देण्यासाठी करार केल्यामुळे अर्जदाराने आपल्या रेस्टॉरंटसाठी खरेदीदार आणावा अशी फिर्यादीची इच्छा होती. ऑगस्ट २०२४ मध्ये, कयूम खान नावाच्या खरेदीदारामध्ये एक बैठक झाली आणि त्याने निर्वेध मालकी हक्काच्या अधीन राहून हे रेस्टॉरंट खरेदी करण्यासाठी १२.५ कोटींची ऑफर दिली होती. प्रकाश व्यास आणि फिर्यादी यांच्यात वाद निर्माण झाल्यामुळे, फिर्यादीने अर्जदारावर श्री. कयूम खान यांच्याकडून काही टोकन रक्कम मिळावी यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली जी फिर्यादी आणि प्रकाश व्यास यांच्यातील सामंजस्यानुसार मालकी हक्क निर्वेध करण्यासाठी वापरली जाईल. अर्जदाराने तसे करण्यास नकार दिल्याने फिर्यादीने त्याला खोटे अडकवले.

९. पुढे असे सादर केले की अर्जदाराची आई ७३ वर्षांची असून तिला स्तनाचा कर्करोग झाला आहे. अटकपूर्व जामीन अर्जासोबत कर्करोगतज्ज्ञांनी तिच्यावर ऑगस्ट २०२४ मध्ये शस्त्रक्रिया करण्याची शिफारस करणारे काही वैद्यकीय अहवाल आणि दिनांक १३ मे २०२५ रोजीची ब्रीच कँडी रुग्णालयातील कागदपत्रे आहेत ज्यात त्याच्या आईवर शस्त्रक्रिया करण्याची शिफारस केली आहे. वडील आणि मोठ्या भावाच्या निधनानंतर

आईची काळजी घेणारा अर्जदार हा एकमेव व्यक्ती आहे. अर्जदार घटस्फोटित आहे. अशा सर्व कारणांमुळे त्यांचा अटकपूर्व जामिनाचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

१०. मी पक्षकारांचे सविस्तर युक्तिवाद ऐकले आहेत आणि त्यांच्या मदतीने अभिलेखाचे अवलोकन केले आहे. सुरुवातीला, गुणवत्तेत जाण्यापूर्वी काही पार्श्वभूमी आवश्यक आहे. अर्जदाराने १३ मे २०२५ रोजी अर्ज सादर करून प्रकरण तातडीच्या बोर्डावर घेण्याची विनंती केली होती, मुख्यत: त्याच्या आईला कर्करोग झाला आहे आणि तिच्यावर शस्त्रक्रिया करायची आहे या कारणास्तव. तथापि, १३ मे २०२५ रोजी गुणवत्तेच्या आधारे युक्तिवाद करण्यात आला. सुनावणीदरम्यान प्रथमदर्शनी असे जाणवले की अर्जदाराकडे तपासाच्या या टप्प्यावर हस्तक्षेप करण्याचे प्रकरण असू शकत नाही. या पार्श्वभूमीवर, अर्जदाराच्या आईची तब्येत ठीक नसल्याच्या याचिकेवर एपीपींना सूचना घेता याव्यात तसेच अर्जदाराला प्रस्तुतच्या अर्जावर आपली भूमिका विचारात घेता यावी, यासाठी सध्याची कार्यवाही १४ मे २०२५ पर्यंत तहकूब करण्यात आली. आश्चर्याची बाब म्हणजे, अशी विनंती अर्जदाराच्या वतीने करण्यात आली की या कार्यवाहीचा बराचसा युक्तिवाद झाला असला आणि सुट्टीच्या न्यायालयाने बराच वेळ व्यतीत केल्यानंतरही अर्ज मागे घेण्याची परवानगी देण्यात यावी आणि अर्ज तहकूब

करावा आणि पुढील विचारासाठी नियमित न्यायालयासमोर ठेवण्यात यावा. माझ्या मते अटकपूर्व जामीन मागणाऱ्या पक्षकाराचे असे वर्तन प्रामाणिक पक्षकाराकडून अपेक्षित नाही. हे न्यायालयाबरोबर संधी घेण्यासारखे होईल, जी कोणत्याही मानकांनुसार स्वीकारार्ह परिस्थिती नाही. त्यानुसार ही विनंती न्यायालयाने फेटाळून लावली. १४ मे २०२५ रोजी, अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी अवलंबून राहण्याचा निर्णय घेतलेल्या अतिरिक्त कागदपत्रे अभिलेखावर आणि त्यांना विचारात घेण्यासाठीच्या या अर्जावर पुन्हा पक्षकारांचे सविस्तर युक्तिवाद ऐकले. अशा सविस्तर सुनावणीनंतर, आदेश देण्यासाठी १६ मे २०२५ रोजी कामकाज तहकूब करण्यात आले. अशा परिस्थितीत हा अर्ज तार्किक निष्कर्षापर्यंत नेणे ही न्यायिक आवश्यकता असेल.

११. सर्वप्रथम, हे लक्षात घ्यावे की आरोपी क्रमांक २ व ३ ला फिर्यादीकडून मिळालेल्या ८२ लाख रुपयांच्या रकमेची पावती वादातीत नाही. फिर्यादी पक्षाचे म्हणणे असे आहे की या ८२ लाख रुपयांच्या रकमेतून ९.५० लाख रुपयांची रक्कम अर्जदाराला बँक हस्तांतरणाद्वारे हस्तांतरित करण्यात आली आणि ९.२५ लाख रुपयांची रोख रक्कम अर्जदाराला प्राप्त झाली आहे. यावर अर्जदाराचे म्हणणे असे आहे की आरोपी क्रमांक ३ कडून अर्जदाराला प्राप्त झालेली रु.११,४५,०३४/- ची रक्कम वरील वस्तुस्थिती व

परिस्थितीत कर्जाच्या स्वरूपात आहे. हे संशयस्पद आणि पश्चात बुद्धीने केलेले आहे असे वाटते, कारण अशा कर्जासंदर्भात कोणतेही दस्तऐवज अर्जदाराने अभिलेखावर ठेवलेला नाही आणि/ किंवा अशा सादरीकरणाला पुष्टी देणारे कोणतेही साहित्य नाही. आरोपी क्रमांक ३ कडून अर्जदाराच्या बँक खात्यात तसेच रोख स्वरूपात काही रक्कम मिळाली आहे ज्यावर अर्जदार वाद घालत नाही. अर्जदाराची चौकशी करून फिर्यादीने आरोपींना दिलेल्या ८२ लाख रुपयांच्या रकमेशी त्याचा संबंध आहे का, याची चौकशी होणे गरजेचे आहे. अभिलेखावरील सामग्री, ज्यात अटकपूर्व जामीन अर्जाच्या निशाणी पृष्ठ ९१ आणि ९२ वर दाखल करण्यात आलेल्या काही व्हॉट्सॲप चॅटसह वरून हे स्पष्टपणे दर्शविते की अर्जदाराला आरोपी क्रमांक ३ आणि फिर्यादी यांच्यात झालेल्या वादातीत व्यवहारासंदर्भातील दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजीच्या सामंजस्य कराराची(MOU) पूर्ण माहिती होती आणि तो त्यातील एक पक्षकार होता. यामुळे अर्जदाराचे प्रकरण खोटे ठरेल की त्याचा आरोपी क्रमांक २ आणि ३ शी काहीही संबंध नाही. फिर्यादी पक्षाच्या म्हणण्यानुसार, एक आरोपी फरार असून दुसऱ्याचा जामीन अर्ज प्रलंबित आहे.

१२. अर्जदाराचे वर्तन दखलपात्र आहे. त्याच्याविरुद्ध सहा फौजदारी तक्रारी/प्रकरणे आहेत आणि तीही सध्याच्या प्रकरणातील कलम ४२०, ४६७ इत्यादींशी संबंधित

गुन्ह्यांमध्ये आहेत. पूर्व इतिहासाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, अर्जदार अशा संशयास्पद व्यवहारांमध्ये सातत्याने सामील होण्याची समान कार्यपद्धती अवलंबत आहे. यावरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, आज फिर्यादी सध्याच्या सीआरमधील आरोपींनी रचलेल्या अशा षडयंत्राला बळी पडला आहे.उद्या आणखी कोणी तरी असू शकते. त्यामुळे अशा पार्श्वभूमीच्या आधारे अर्जदाराचा युक्तिवाद ग्राह्य धरून अर्जदाराची कोठडीतील चौकशी रखडली किंवा रोखली गेली, तर तो न्यायव्यवस्थेचा उपहास ठरेल.

१३. अर्जदाराने सादर केलेले वैद्यकीय अहवाल, ज्यापैकी नवीनतम दिनांक १३ मे २०२५ रोजीच्या अहवालानुसार, असे दिसून येते की तिच्यावर "तात्काळ" शस्त्रक्रियेची शिफारस करण्यात आल्याचे दाखवण्यासाठी काही फेरफार केले आहेत, जे ऑगस्ट २०२४ मध्ये तिला शस्त्रक्रियेची शिफारस करण्यात आली होती,परंतु तेव्हापासून काहीही झाले नाही, यापूर्वीच्या निष्कर्षांच्या विरुद्ध आहे जसे की राज्य सरकारच्या विद्वान एपीपी सुश्री. काक यांनी योग्यरीत्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे अर्जदाराचा हा आधार विश्वासार्ह वाटत नाही.

१४. फिर्यादी पक्षाच्या विद्वान एपीपींनी पंचनामा आणि अर्जदार आणि फिर्यादीची मुलगी यांच्यातील संभाषणाच्या व्हॉईस रेकॉर्डिंगचा उतारा दाखल केला, ज्यात हा अर्जदार बीएमसी अधिकाऱ्यांना लाच देण्यासाठी तिच्याकडे पैशांची मागणी करत आहे, जे अशा सामग्रीवरून स्पष्ट होते. अर्जदार सहमत नसला तरी फिर्यादीची मुलगी आणि अर्जदार यांच्यात संभाषण झाले ही वस्तुस्थिती वादग्रस्त नाही. असे साहित्य प्रथमदर्शनी अर्जदाराकडून संभाव्य साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न दर्शविते, जे कायदेशीररित्या अमान्य आहे आणि ते नाकारले पाहिजे.

१५. फिर्यादी पक्षाने सातत्याने असे सादर केले आहे की येथे एक अर्जदार आहे, ज्याने तपासकामात कधीही सहकार्य केले नाही. हे प्रकरण षडयंत्राशी संबंधित असल्याने या टप्प्यावर प्रत्येक व्यक्तीची विशिष्ट भूमिका निश्चित करणे कठीण आहे. फिर्यादी पक्षाने अभिलेखाचा आधार घेत असे सादर केले की अटकपूर्व जामीन अर्जाच्या प्रतिज्ञालेखात नमूद केल्याप्रमाणे अर्जदार प्रस्तुतच्या पत्त्यावर उपस्थित/वास्तव्यालाही नाही, कारण तो तेथे आढळला नाही. अर्जदाराकडे निव्वळ नाकबुली शिवाय कोणतेही ठोस समर्थन नाही. दिलेल्या वस्तुस्थिती आणि परिस्थितीत या अर्जदाराची न्यायापासून पळ काढण्याची फिर्यादी पक्षाची भीती थोडक्यात नाकारता येत नाही. या सगळ्यावरून असे

दिसून येते की, अटकपूर्व जामिनासाठी केलेल्या अर्जातही अर्जदाराने स्वच्छ हाताने न्यायालयात धाव घेतली नाही, जी अटपूर्वक जामीनासाठीच्या अर्जातही अनिवार्य बाब आहे.

१६. फिर्यादीच्या विद्वान वकिलांनी केलेल्या यायुक्तिवादात तथ्य आहे की, एका ७६ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला त्याची बचत आणि कष्टाने कमावलेले पैसे पूर्णपणे बेकायदेशीर फायद्यासाठी एकमेकांशी संगनमत करून काम करणाऱ्या आरोपींनी अवलंबलेल्या अशा संशयास्पद हेतू आणि कार्यपद्धतीमुळे गमवावा लागला आहे. या संदर्भात, माझ्या प्रथमदर्शनी मते, तक्रारीमध्ये तथ्य आहे ज्यासाठी कायद्याने बंधनकारक असलेल्या प्रभावी आणि योग्य तपासासाठी अर्जदाराची चौकशी करावी लागू शकते.

१७. या टप्प्यावर, सुमिता प्रदीप विरुद्ध अरुण कुमार सी.के.आणि अन्य[१]. [1]या खटल्यात माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचा संदर्भ देणे योग्य ठरेल. ज्यामध्ये परिच्छेद १२ मध्ये असे म्हटले आहे :-

> “१२. आम्ही अशा प्रकरणाचा निपटारा करीत आहोत ज्यामध्ये मूळ फिर्यादी (यात अपीलकर्ता) या न्यायालयासमोर येऊन विनंती करतो की उच्च न्यायालयाने

[1] १. (२०२२) एस सी सी ऑनलाईन एस सी १५२९

आरोपींना दिलेला अटकपूर्व जामीन रद्द करण्यात यावा. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर, पॉक्सोसारख्या अत्यंत गंभीर गुन्ह्यातील आरोपीला अटकपूर्व जामीन देताना उच्च न्यायालयाने आपल्या विवेकबुद्धीचा चुकीचा वापर केला आणि, त्यामुळे, आरोपीला अटकपूर्व जामीन देण्याचा उच्च न्यायालयाने दिलेला आदेश रद्दबातल करावा आणि रद्द करावा, असे फिर्यादीचे म्हणणे आहे. अनेक अटकपूर्व जामीन प्रकरणांमध्ये, कोठडीतील पूसतपासाची गरज नाही, त्यामुळे अटकपूर्व जामीन मंजूर केला जाऊ शकतो, असा एक सामान्य युक्तिवाद केला जात असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. असा एक गंभीर गैरसमज कायद्याबद्दल दिसतो की, जर प्रकरणात फिर्यादी पक्षाकडून कोठडीतील चौकशीसाठी काहीही प्रस्थापित होत नसेल, तर तोच अटकपूर्व जामीन मंजूर करण्याचा चांगला आधार असेल. अटकपूर्व जामीन अर्जावर निर्णय घेताना इतर कारणांसह कोठडीतील चौकशी इतर कारणांसोबत विचारात घेण्यासारख्या संबंधित पैलूंपैकी एक असू शकते. अशी अनेक प्रकरणे असू शकतात ज्यात आरोपीच्या कोठडीतील चौकशीची आवश्यकता नसते, परंतु याचा अर्थ असा नाही की आरोपीवरील प्रथमदर्शनी गुन्ह्याकडे दुर्लक्ष केले जावे किंवा वगळले

जावे आणि त्याला अटकपूर्व जामीन मंजूर केला जावा. अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी घेणाऱ्या न्यायालयाने विचारात घेतलेली प्रथम आणि महत्त्वाची बाब म्हणजे आरोपींविरुद्धचा प्रथमदर्शनी गुन्हा. त्यानंतर, शिक्षेच्या तीव्रतेसह गुन्ह्याचे स्वरूप ही पाहिले पाहिजे. अटकपूर्व जामीन नाकारण्याचे एक कारण कोठडीतील चौकशी असू शकते. मात्र, कोठडीत चौकशीची आवश्यकता नसली किंवा गरज नसली तरी अटकपूर्व जामीन देण्याचा आधार असू शकत नाही.

सीबीआय विरुद्ध अनिल शर्मा[2], या खटल्यातील माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातही असेच प्रमाण आहे, त्यातील परिच्छेद ४ खालीलप्रमाणे आहे:-

"४. आम्हाला सीबीआयच्या या युक्तिवादात तथ्य आढळते की संहितेच्या कलम ४३८ अन्वये अनुकूल आदेशाने चांगल्या प्रकारे सुरक्षित असलेल्या संशयिताची चौकशी करण्यापेक्षा कोठडीतील चौकशी करणे गुणात्मकदृष्ट्या अधिक योग्य असते. अशा प्रकरणात, संशयित व्यक्तीची प्रभावी चौकशी केल्यास अनेक उपयुक्त माहिती आणि दडवून ठेवलेले पुरावे उघडकीस आणण्यासाठी अत्यंत

[2] १९९७ एआयआर एससी ३८०६

फायदेशीर ठरते. जर संशयित व्यक्तीला माहित असेल की चौकशी दरम्यान तो अटकपूर्व जामिनामुळे चांगल्या प्रकारे सुरक्षित आहे, तर अशा चौकशीत यश मिळू शकणार नाही. अनेकदा अशा परिस्थितीत चौकशी करणे केवळ एक सोपस्कार बनवून राहते. कोठडीतील चौकशी ही त्या व्यक्ती विरुद्ध थर्ड डिग्री पद्धतीच्या वापर होण्याचा धोका आहे हा युक्तिवाद मान्य करण्याची गरज नाही, कारण असा युक्तिवाद सर्व फौजदारी खटल्यांमधील सर्व आरोपींकडून मांडला जाऊ शकतो. न्यायालयाने असे गृहीत धरले पाहिजे की जबाबदार पोलिस अधिकारी जबाबदारीने वागतील आणि ज्यांच्यावर माहिती शोधण्याची जबाबदारी सोपवली आहे ते गुन्हेगारांप्रमाणे वागणार नाहीत."

(जोर दिला)

वरील बाबींचा विचार करता, माझ्या मते, अर्जदाराने अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासाठी कोणताही खटला मांडलेला नाही. तपासाच्या प्रक्रियेत ढवळाढवळ करण्याचे आणि तपासाच्या चाकांना ब्रेक लावण्याचे कोणतेही कारण नाही कारण कायदा न्यायालयाला दिलेल्या तथ्ये आणि परिस्थितीत असा दृष्टिकोन घेण्याची परवानगी देत नाही. अशा पार्श्वभूमीवर, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराचे वर्तन पाहता

अर्जदाराची विशिष्ट वस्तुस्थिती व परिस्थितीत कोठडीत चौकशी केल्यास सत्य समोर येण्याची आणि प्रकरणाच्या मुळाशी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१८. अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी बिपीनभाई शेठ विरुद्ध गुजरात राज्य आणि अन्य[३]; विशाल उर्फ जंगल्या शाम सातपुते विरुद्ध महाराष्ट्र राज्य[४]; प्रवीण दिगंबरराव जाधव विरुद्ध महाराष्ट्र राज्य[५] आणि गजानन पंढरीनाथ मारणे [3]वि. महाराष्ट्र राज्य[६] या प्रकरणातील न्यायनिर्णयांवर विश्वास ठेवला. या संदर्भात कायदा बऱ्यापैकी प्रस्थापित आहे. हाही तितकाच कठोर कायदा आहे की जामीन/अटकपूर्व जामिनाच्या बाबतीत कोणतीही सरळ सोपी पद्धत लागू करता येणार नाही, जी प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थितीवर पूर्णपणे अवलंबून असते. माझ्या मते, ही सुस्थापित कायदेशीर स्थिती लक्षात घेता, अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी उद्दत केलेले न्यायनिर्णय तुकड्यांमध्ये वाचता येणार नाहीत आणि जर पूर्णपणे वाचले तर असे निर्णय प्रस्तुतच्या कार्यवाहीच्या वस्तुस्थितीला स्पष्टपणे लागू होणार नाहीत.

[3] (२०१६)१ एस सी सी १५२
४. या न्यायालयाने एबीए क्रमांक ३५५७/२०२२ मध्ये दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी दिलेला आदेश.
५. या न्यायालयाने एबीए क्रमांक २१४/२०२३ मध्ये दिनांक ८ मार्च २०२३ रोजी दिलेला आदेश.
६. या न्यायालयाने एबीए क्रमांक ३०५३/२०३१ मध्ये दिनांक १३ जुल २०२२ रोजी दिलेला आदेश.

१९. उपरोक्त चर्चेच्या अनुषंगाने, मला अटकपूर्वक जामीन अर्जामध्ये काहीही योग्यता दिसत नाही आणि त्यानुसार मी खालील आदेश पारित करतो :-

आदेश

(१) अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात येतो.

(२)अंतरिम अर्ज, काही असल्यास ते देखील फेटाळण्यात येतात.

[न्या.अद्वैत एम. सेठना.]

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x